# महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

**(विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त व महाराष्ट्र व गोवा शासन प्राधीकृत)**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सेट भवन, गणेशखिंड पुणे,-४११००७.

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र.: ०२० – २५६२२४४६<br>संकेतस्थळ : https://setexam.unipune.ac.in | फॅक्स क्र. : ०२० – २५६९९२५०<br>ई–मेल : set_coordinator@unipune.ac.in |


सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा

OW/2026/G/87 दि. २७/०६/२०२६

**दि. २६ जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ४१ व्या सेट परीक्षा जाहिरात क्र. १२ चे शुद्धीपत्रक आणि सेट परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ.**

सेट परीक्षेची जाहिरात क्रमांक १२, दिनांक २८ मे, २०२६ रोजी महाराष्ट्र व गोवा राज्यातील विविध वर्तमानपत्रात तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. संकेतस्थळावरील जाहिरातीत व माहितीपुस्तकात खालीलप्रमाणे उल्लेख केला होता.

| संवर्ग | नियमित शुल्क | विलंब शुल्कासह शुल्क |
|---|---|---|
| १. खुला | रू. ८००/— | रू. १,३००/— |
| २.इतर मागासवर्गीय/भटक्या व विमुक्त जाती जमाती/सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग (फक्त उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या उमेदवारांसाठी)(For Non-Creamy Layer)*/ खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS)/आणि विकलांग प्रवर्ग(PwD)/ अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ तृतीयपंथी/अनाथ | रू. ६५०/— | रू. १,१५०/— |

त्याऐवजी जाहिरात व माहितीपुस्तक खालीलप्रमाणे वाचावे

| संवर्ग | नियमित शुल्क | विलंब शुल्कासह शुल्क |
|---|---|---|
| १. खुला | रू. ८००/— | रू. १,३००/— |
| २.इतर मागासवर्गीय/भटक्या व विमुक्त जाती जमाती/सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग/ **विशेष मागास वर्ग** (फक्त उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या उमेदवारांसाठी) (For Non-Creamy Layer)*/ खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS)/आणि विकलांग प्रवर्ग(PwD)/ अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ तृतीयपंथी/अनाथ | रू. ६५०/— | रू. १,१५०/— |

त्यानुसार सेट परीक्षा अर्ज भरण्यासाठी **दिनांक २७ जून, २०२६ ते ०३ जुलै, २०२६** अशी विनाविलंब शुल्क मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच दिनांक ४ जुलै, २०२६ ते ७ जुलै, २०२६ अशी विलंब शुल्कासहित मुदतवाढ देण्यात येत आहे. यापूर्वी विशेष मागास प्रवर्गाच्या ज्या विद्यार्थ्यांनी विशेष मागास प्रवर्गाव्यतिरीक्त इतर प्रवर्गातून सेट परीक्षा अर्ज भरले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जात संवर्ग दुरुस्त करण्यासाठी दिनांक ८ जुलै, २०२६ ते १० जुलै, २०२६ अशी मुदत देण्यात येत आहे. उपरोक्त विशेष मागास प्रवर्ग (SBC) या प्रवर्गाच्या संभाव्य आरक्षणाबाबत शासनाचे या संबंधीचे आदेश व मार्गदर्शन तसेच मा. उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठातील याचिका क्र. ५८८५ च्या अधीन राहून कार्यवाही करण्यात येईल.

**प्रभारी कुलसचिव तथा सदस्य सचिव**
**(सेट परीक्षा)**